# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.12.2025** **वारःशुक्रवार**

---

1. वीर बाल दिनानिमित्त आज नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय बाल पुरस्कारांच वितरण
2. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं आयोजन
3. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून व्यावसायिक उड्डाणांना सुरुवात
4. रेल्वेची भाडेवाढ लागू, उपनगरी रेल्वे आणि मासिक पासच्या दरात बदल नाही आणि
5. महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील तिसरा टी 200 सामना आज तिरुवंतपूरममध्ये

**राष्ट्रपती- बाल पुरस्कार**

वीर बाल दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. शौर्य, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या 18 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील 20 मुलांना या पुरस्कारांसाठी निवडण्यात आलं असल्याचं महिला आणि बाल विकास मंत्रालयानं सांगितलं. राष्ट्रीय स्तरावरील या कार्यक्रमात देशाचा समृद्ध वारसा आणि शौर्याची भावना दर्शविणारे सांस्कृतिक कार्यक्रम देखील पाहायला मिळतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्यांना पंतप्रधान संबोधितही करणार आहेत. श्री गुरु गोविंद सिंह जी यांचे पुत्र बाबा जोरावर सिंह जी आणि बाबा फतेह सिंह जी-साहिबजादे यांच्या शौर्य आणि बलिदानाचा सन्मान करण्यासाठी 'वीर बाल दिवस' पाळला जातो. जानेवारी 2022 मध्ये गुरु गोविंद सिंह जी यांच्या प्रकाश पर्वादरम्यान पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा याची घोषणा केली होती.

**प्रेरणास्थळ**

गेल्या 11 वर्षांपासून आपलं सरकार समाजातील प्रत्येक नागरिकाच्या कल्याणासाठी कठोर परिश्रम करत आहे आणि कोणताही भेदभाव न करता योजनांचे लाभ त्यांना देत आहे. हेच खरं धर्मनिरपेक्ष प्रशासन आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या 101 व्या जयंतीनिमित्त लखनौमध्ये बांधण्यात आलेल्या राष्ट्र प्रेरणा स्थळाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

**आदरांजली**

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त काल देशभर त्यांना अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत 'सदैव अटल' या समाधीस्थळी जाऊन वाजपेयी यांना आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त काल मुंबईत 'राष्ट्रनायकाचा जीवन प्रवास' या चित्रप्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**उपहारगृह दिल्ली**

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या 101 व्या जयंतीनिमित्त काल नवी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि केंद्रीय मंत्री मनोहर लाल यांनी राष्ट्रीय राजधानीत अटल उपहारगृहाचं उद्घाटन केलं. शहरातील गरजू आणि कष्टकरी लोकांसाठी ही उपयुक्त योजना असल्याचं रेखा गुप्ता यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. या उपहारगृहांमध्ये फक्त 5 रुपयांत जेवण मिळणार आहे. काल 45 उपहारगृह सुरू झाली असून उर्वरित 55 उपहारगृह येत्या 15 दिवसात सुरू होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>संसद खेलरत्न</u>**

देशभरात विविध ठिकाणी झालेल्या खासदार क्रीडामहोत्सवांचा समारोप काल झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील खेळाडूंशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. या क्रीडा महोत्सवामुळे देशाला हजारो खेळाडू मिळाले असून या महोत्सवाची व्याप्ती आणि प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे, असं पंतप्रधान म्हणाले. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

**<u>दहशतवाद-शहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. दोन दिवसांच्या या परिषदेमध्ये राष्ट्रीय सुरक्षा आणि दहशतवादामुळं उद्भवणारे धोके या विषयावर चर्चा करण्यात येईल. दहशतवाद विरोधी कार्यात सहभागी असलेले सुरक्षा दलातील अधिकारी, आणि न्यायवैद्यक पथकातील अधिकारी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. दहशतवादाविरोधातील कारवाईसाठी संबंधित विविध घटकांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशानं ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

**<u>विमानतळ</u>**

नवी मुंबई इथलं आंतरराष्ट्रीय विमानतळ हे केवळ हवाई सेवा नसून महाराष्ट्राच्या विकासाला नवी उंची देणारं प्रवेशद्वार आहे, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून कालपासून व्यावसायिक उड्डाणं सुरू झाली. त्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. काल सकाळी आठ वाजता बेंगळुरूहून आलेलं पहिलं विमान धावपट्टीवर उतरलं. या विमानाला हवेत पाण्याचे फवारे सोडून सलामी देण्यात आली. तर सकाळी पावणेनऊ वाजता या विमानतळावरून हैदराबादच्या दिशेने पहिलं विमान आकाशात झेपावलं. सध्या या विमानतळावरून देशभरातल्या नऊ विमानतळांवर विमान प्रवास सुरू करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात सकाळी आठ ते रात्री आठ अशी बारा तासापुरती विमानसेवा सुरू राहील.

**<u>बांग्लादेश हसीना</u>**

बांग्लादेशात मोहम्मद युनुस यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकार देशातल्या गैर-मुसलमान नागरिकांवर अकल्पित अत्याचार करत असल्याचे बांग्लादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांनी म्हटलं आहे. बेकायदेशीररित्या सत्ता बळकावलेला सत्ताधारी पक्ष धार्मिक अल्पसंख्यांकांच्या हत्या करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नाताळ निमित्त प्रसारित केलेल्या संदेशात त्यांनी युनूस सरकारवर टीका केली आहे.

**<u>बांग्लादेश रहमान</u>**

बांग्लादेश नॅशनलिस्ट पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी काल देशातल्या नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले. 17 वर्षांनंतर ढाका इथं परतल्यानंतर त्यांनी पक्षाच्या समर्थकांना संबोधित केलं. हा देश मुस्लीम, हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चन यांच्यासह सर्व धर्माच्या लोकांचा असल्याचं रहमान म्हणाले. गेल्या वर्षी हंगामी सरकार स्थापन झाल्यापासून देशात होणाऱ्या अल्पसंख्याकांविरोधात विशेषतः हिंदूविरोधात घडलेल्या घटनांच्या संदर्भाने त्यांनी शांततेचे हे आवाहन केले आहे.

**<u>भाडेवाढ</u>**

रेल्वेनं प्रवास भाडे आकारणीत बदल केले असून ते मध्यरात्रीपासून लागू झाले आहेत. यात अनारक्षित किंवा द्वितीय श्रेणीच्या प्रवास भाड्यात पहिल्या 215 किलोमीटर अंतरापर्यंत काहीही बदल झालेला नाही. या दरवाढीनंतर 500 किलोमीटरचा प्रवास द्वितीय श्रेणीतून करणाऱ्यांचं भाडं 10 रुपयांनी वाढणार आहे. तर वातानुकूलित श्रेणीतल्या प्रवाशांना 20 रुपये अतिरिक्त द्यावे लागतील. उपनगरी गाड्या आणि मासिक पासच्या दरात काहीही बदल केलेला नाही, असं रेल्वेनं जाहीर केलं आहे.

**नाताळ**

नाताळचा सण काल जगभरात सर्वत्र उत्साहाने साजरा करण्यात आला. ठीकठिकाणचे चर्च आणि प्रार्थनागृहांमध्ये गुरुवारी मध्यरात्री प्रभू येशू ख्रिस्ताचा जन्मोत्सव आणि विशेष प्रार्थना झाली. नाताळ आणि नववर्ष स्वागताच्या निमित्तानं बाजारपेठा गर्दीने फुलून गेल्या आहेत. विविध चर्चवर आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली आहे.

**महा एटीएस**

राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये सामील असल्याच्या संशयावरून अटकेत असलेल्या जुबेर हंगरगेकर याला महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक म्हणजेच एटीएसने काल पुन्हा नव्याने अटक केली आहे. बेकायदेशीर कृत्य प्रतिबंध कायद्याअंतर्गत महाराष्ट्रातल्या पुण्याच्या विशेष न्यायालयाने त्याला 3 जानेवारीपर्यंत एटीएस कोठडी सुनावली आहे. हंगरगेकरच्या टेलिग्राम या समाजमाध्यम खात्यावर अफगाणिस्तान आणि हाँगकाँग मधील आयपी अँड्रेस आढळल्याने त्याबाबत अधिक तपास करण्यासाठी त्याला ताब्यात देण्याबाबत एटीएसने युक्तिवाद केला होता. अल कायदा आणि भारतीय उपखंडातील अल कायदा या बंदी घातलेल्या संघटनांशी संबंध तसेच दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या संशयावरून जुबेरला ऑक्टोबरमध्ये अटक करण्यात आली होती.

**पक्षांतर**

महाराष्ट्रातल्या 29 महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर, प्रमुख राजकीय पक्षांच्या हालचाली वेगानं सुरु आहेत. राज्यातली सत्ताधारी महायुती आणि विरोधकांची महाविकास आघाडी यांच्या घटक पक्षांमध्ये स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरणं मांडली जात आहेत. विविध पक्षातील नेते पक्षांतर करत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यातील तिसरा आंतरराष्ट्रीय टी 20 सामना आज तिरुवंतपूरम इथल्या ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय मैदानावर संध्याकाळी 7 वाजता खेळला जाणार आहे. भारतीय संघानं 5 सामन्यांच्या या मालिकेत 2-0 अशी आघाडी घेतली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.